## (२ – ब) आरती

जय देव जय देव दत्ता अवधूता । साई अवधूता ।
जोडुनी कर तव चरणीं ठेवितो माथा । जय देव० ।। ध्रु०।।

अवतरसीं तूं येता धर्मातें ग्लानी ।
नास्तिकांनाही तू लाविसी निजभजनीं ।
दाविसी नाना लीला असंख्य रूपांनी ।
हरिसी दीनांचे तू संकट दिनरजनी ।। ज० ।। १ ।।

यवनस्वरूपीं एक्या दर्शन त्वां दिधलें ।
संशय निरसुनियां तद्द्वैता घालविलें ।
गोपीचंदा मंदा त्वांची उद्धरिलें ।
मोमिन वंशी जन्मुनि लोकां तारियलें ।। ज० ।। २ ।।

भेद न तत्त्वीं हिंदू यवनांचा कांहीं ।
दावायासी झाला पुनरपि नरदेही ।
पाहसि प्रेमानें तू हिंदू–यवनांही ।
दाविसी आत्मत्वाने व्यापक हा साई ।। ज० ।। ३ ।।

देवा साईनाथा त्वत्पदनत भावें ।
परमायामोहित जनमोचन झणिं व्हावें ।
त्वत्कृपयें सकलांचे संकट निरसावें ।
देशिल तरी दे त्वद्यश कृष्णानें गावें ।। ज० ।। ४ ।।